*शक्तीनगर दुर्गापूर येथे पालकमंत्री चषक राज्यस्तरीय फुटबॉल सामन्यांचा पारितोषिक वितरण सोहळा 4 डिसेंबर 2018 रोजी*

*सुप्रसिध्द सिने अभिनेता सोनु सुद यांची विशेष उपस्थिती*
==================================================================

भारतीय जनता पार्टी, चंद्रपूर तालुका शाखेतर्फे आयोजित पालकमंत्री चषक राज्यस्तरीय फुटबॉल सामन्यांचा पारितोषिक वितरण सोहळा मंगळवार दि. 4 डिसेंबर 2018 रोजी आ ेयोजित करण्यात आला असुन या सोहळयाला सुप्रसिध्द सिने अभिनेता सोनु सुद यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

राज्याचे अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने आयोजित पालकमंत्री चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा दुपारी 3 वाजता शक्तीनगर, वेकोली दुर्गापूर कॉलनी येथील गणेश ग्राऊंड मध्ये आयोजित करण्यात आला आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना सुप्रसिध्द सिने अभिनेता सोनु सुद यांच्या हस्ते पारितोषिके वितरीत करण्यात येणार आहे. या प्रसंगी अर्थमंत्री तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची विशेष उपिस्थती राहणार आहे.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी या नात्याने महाराष्ट्र वनविकास महामंडाळाचे अध्यक्ष चंदनसिंह चंदेल,आ. नानाजी शामकुळे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष देवराव भोंगळे, भाजपाचे जिल्हा अध्यक्ष, हरिश शर्मा,जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती ब्रिजभुषण पाझारे, चंद्रपूरच्या महापौर सौ. अंजली घोटेकर, स्थायी समिती सभापती राहुल पावडे, मनपा सदस्य रामपाल सिंह, भाजपाचे चंद्रपूर तालुका अध्यक्ष हनुमान काकडे, जिल्हा परिषद सदस्या रोशनी खान, गौतम निमगडे गुरूजी, सौ. वनिता आसुटकर, पंचायत समिती उपसभापती चंद्रकांत धोडरे, पंचायत समिती सदस्य संजय यादव, केमा रायपुरे, सिंधु लोनबले आदिंची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

या पारितोषिक वितरण सोहळयाला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय जनता पार्टी चंद्रपूर तालुका शाखेतर्फे करण्यात आले आहे.